॥ श्री ॥
॥ बाबा ॥

जय देवी ,जय माते,उल्हास सरिते ।
नावाची सार्थकता, साक्षात अवतरते ॥धृ॥

तुझा महिमा,वर्णिती मुनिजन
दावोनि तुझ्यातील,अमृत अनमोल ।
तोषोनि जीवा नेशी,साक्षात शिवाप्रत ।
म्हणोनि देतो हे,प्रेमाने अर्घ्य ॥1॥

तुझे जन्मस्थान,गिरीराज सहयाद्री
निघाली स्वगृही,जनहिता कारणी ।
आई आमुच्या हदयी,नित्य राहोनी
दावी नित्य पथ,जीवा उदधरणी ॥2॥

पंचतत्वी देहाचा । करुनी द्रोण ।
पंचप्राण ज्योत,तूज ओवाळून ।
कढई पूजा करोनी, नैवेदय अर्पितो ।
तुलाच आम्ही, हरहर गंगे म्हणतो ॥3॥

★★★★★